जनसामान्यांच्या मनातील आरसा

Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028

वरुड | सोमवार

१६.११.२०२६

वरुड दर्पण

संपादक - चंद्रकांत भा. भड

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235

chandubhad@gmail.com

www. waruddarpan.com

9422157712, 9763157712

वर्ष: ०७ | अंक: ४२ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

अमरावती-नागपूर-चंद्रपुर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव

+91 7745067712

अमित शाहांनी सांगितला अजित पवारांचा आवडलेला गुण, अनेक किस्से

अजितदादांच्या अपघाताबाबत स्पष्टता यावी, अहवाल लवकर यावा

देवेंद्र फडणवीसांची अमित शाहांसमोर मागणी

कार्यक्रमात सुनेत्रा पवार भावूक, एकनाथ शिंदेही आठवणीने गहिवरले

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



पुणे - राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अर्धाकृती पुतळ्याचे अनावरण आज केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्याहस्ते संपन्न झाले. या सोहळ्यात सर्वच मान्यवरांनी अजित पवारांच्या आठवणींना उजाळा देत त्यांच्या कार्याची आणि पुणे, पिंपरी चिंचवडवरील प्रेमाची आठवण सांगितली.

तर, अमित शाह यांनी अजित पवारांच्या आठवणी सांगताना अनेक किस्से सांगितले. जे पटलं ते होय आणि जे नाही पटलं ते नाही असे परखडपणे बोलणारे अजित पवार होते. महायुतीमधील जागांच्या वाटाघाटीवेळी ते आपलं मत स्पष्ट मांडायचे, होय तर होय किंवा नाही... दादांचा हा गुण आपल्याला खूप आवडायचा, असे अमित शाहांनी म्हटले. अमित शाहांच्या भाषणावेळी व्यासपीठ भावूक झाल्याचं दिसून आलं. पुणे जिल्हा परिषदेच्या प्रवेशद्वाराजवळ आज दिवंगत अजित पवार यांच्या अर्धाकृती पुतळ्याचं अनावरण करण्यात आलं. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते पुतळ्याचं अनावरण पार पडलं.

या सोहळ्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, कृषीमंत्री दत्ता भरणे, केंद्रीयमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, महापौर मंजुषा नागपुरे उपस्थित होते. शरद पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे देखील अजित पवार यांच्या अर्धाकृती पुतळ्याच्या अनावरणाच्या सोहळ्यासाठी उपस्थित होत्या. अजित पवारांच्या कामाचा झपाटा, ग्रामीण महाराष्ट्राशी जोडलेली नाळ, आणि सहकार क्षेत्रातील त्यांच्या अनुभव, अभ्यासाच्या आठवणींना अनेक मान्यवरांनी आपल्या भाषणातून उजाळा दिला. आपल्या छोट्या-मोठ्या कार्यकर्त्यांसाठी, नेत्यांसाठी लढणारे नेते खूप कमी असतात, अजितदादांनी नेहमीच राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांचा विचार केला, असे अमित शाह यांनी सांगितले. सकाळी ७ वाजता त्यांच्याशी बोलणं व्हायचं अजित पवारांचं व्यक्तिमत्व सकारात्मक होतं, ते स्पष्टवक्ते होते. स्पष्टवक्तेपणा खूप कमी लोकांमध्ये असतो. अजितदादांच्या निधनामुळे राज्याचं मोठं नुकसान झालंय. अजितदादा माझे मित्र आणि सहकारी होते, अजितदादांच्या निधनाने माझंही व्यक्तिगत नुकसान झालंय, असे म्हणत अमित शाहांनी अजित पवारांसमवेत सहकार खात्यातील साखर कारखानदारांसाठी घेतलेल्या एका निर्णयाचा किस्सा सांगितला. आमचा कोरोना काळात महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांशी संपर्क होत नव्हता. मात्र, कोरोना काळात कामासाठी अजितदादांचा नेहमी फोन येत होता.

विहिरीच्या मोजमापासाठी उतरले, ढिगारा कोसळल्याने अडकले

२४ तासांनी ४ मजूरांचे मृतदेह सापडले,

पंढरपुरातील आंबेगावातील सुन्न करणारी घटना

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



पंढरपूर - सोलापूरच्या पंढरपूर तालुक्यातील आंबे गावात धक्कादायक घटना घडली. पूर्ण झालेल्या विहिरीचं मोजमाप सुरू असताना अचानक ढिगारा कोसळला. यात चार मजुरांचा मृत्यू झाला. गेल्या २४ तासांपासून एनडीआरएफकडून बचावकार्य सुरू होतं.

अखेर आज सकाळी ११ वाजता चारही जणांचे मृतदेह बाहेर काढण्यात छऊठक्र टीमला यश मिळालं. शेतकरी निवास शिंदे यांच्या विहिरीचं काम पूर्ण झालं होतं. जवळपास ५० फूट खोलीच्या या विहिरीचं मोजमाप घेण्याचं काम सुरू असताना ही दुर्घटना घडली. सदर दुर्घटनेत मृत्यू पावलेल्या मृतांच्या कुटुंबीयांना पाच लाखांची मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून मदत जाहीर करण्यात आली आहे.

तसेच बेकायदा विहीर खोदणे आणि धोकादायक ब्लास्टिंग याचीही चौकशी होणार असल्याची माहिती पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिली. पंढरपूर तालुक्यातील आंबे गावातील शेतकरी निवास शिंदे यांच्या विहिरीत हे काम सुरू होते. पूर्ण झालेल्या विहिरीचे मोजमाप सुरू असताना अचानक विहिरीचा ढिगारा आणि कठडा कोसळला. या दुर्घटनेत ४ मजूर ढिगाऱ्याखाली अडकले होते.

तर दोन मजूर आंबे गावचे आणि दोन आणवलीचे होते. या घटनेत चारही मजूरांचा मृत्यू झाला आहे. शेतात जेसीबीच्या साहाय्याने विहीर खोदण्याचे काम सुरू असताना काल सकाळी सुमारे १० वाजण्याच्या सुमारास ही दुर्घटना घडली. यामध्ये मंगेश मोरे (वय ३५), सिद्धेश्वर घाडगे (वय ४५), आबासाहेब घोडके (वय ५०) आणि तानाजी घोडके (वय ५४) हे चार कामगार ढिगाऱ्याखाली अडकले.

या दुर्घटनेतील दोन मजूरांना सुरुवातीला ढिगाऱ्याखालून बाहेर काढण्यात यश आले होते. त्यानंतर पहाटेच्या सुमारास एक, त्यानंतर सकाळी १० आणि ११ वाजताच्या सुमारास उरलेल्या दोन मजूरांना ढिगाऱ्यातून बाहेर काढण्यात एनडीआरएफ टीमला यश मिळाले. सदर घटनेला २४ तास उलटल्यानंतर चारही मजूरांचे मृतदेह ढिगाऱ्यातून बाहेर काढले.

आलोडा येथील साहेबराव निकम यांचे अपघाती निधन

शहापूर ते वरुड दरम्यान घडला अपघात


(प्रतिनीधी वरुड दर्पण)



वरुड - मुळचे तालुक्यातील आलोडा येथील सेवानिवृत्त शिक्षक, श्री संत गजानन महाराज सार्वजनिक वाचनालय आलोडाचे अध्यक्ष तथा शहरातील साईबाबा कॉलनी परिसरातील रहिवाशी साहेबराव निकम यांचे अपघाती निधन झाले.

साहेबराव निकम (७०) हे शेती आणि इतर कुटूंबिय आलोडा येथे असल्यामुळे सतत आलोडा येथे दुचाकीने येत-जात होते. काल सायंकाळच्या सुमारास एम.एच.२७ टीएन २८२१ क्रमांकाच्या शाईन दुचाकीने आलोडा वरुन वरुडकडे येत असतांना शहापूर ते वरुड दरम्यान असलेल्या हॉटेल वृंदावन नजीक रस्त्या उभ्या असलेल्या ट्रॅक्टर ट्रॉलीच्या मागाहून त्यांच्या दुचाकीची धडक झाली. समोरुन येत असलेल्या वाहनाच्या प्रकाशामुळे त्यांचे डोळे चमकल्याने हा अपघात घडला असावा, असे बोलल्या जात आहे. विशेष म्हणजे अपघात घडल्यानंतर साहेबराव निकम यांच्या शरिरावर कुठल्याही प्रकारची जखम आढळुन आली नाही, त्यामुळे त्या दरम्यान त्यांचे हृदय बंद पडून त्यांचा मृत्यू झाला असावा, असा अंदाज व्यक्त केल्या जात आहे. अपघात घडताच पोलिसांना पाचारण करण्यात आले. पंचनामा करुन मृतदेह ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदनाकरीता पाठविण्यात आला. आज सकाळच्या सुमारास शवविच्छेदन पार पडल्यानंतर त्यांचा पार्थिव आलोडा येथे नेण्यात आला. त्यांच्या निधनाची वार्ता कळताच अनेकांनी त्यांच्या निवासस्थानाकडे धाव घेतली. अत्यंत सुस्वभावी आणि निगर्व व्यक्तीमत्वाचे धनी असलेले साहेबराव निकम यांच्या पार्थिवावर आलोडा येथे स्वकीय, आप्तेष्ट, नातेवाईक आणि ग्रामस्थांच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, मुलगा उज्वल, मुलगी समिक्षा, सुन, जावई, नातवंड असा बराच मोठा आप्तपरिवार आहे.





ठाण्यात छठपूजेच्या उत्सवाला गालबोट

२० वर्षीय तरुणाचा तलावात बुडून दुर्देवी मृत्यू

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



ठाणे - छठपूजेच्या विधीदरम्यान कळवा येथील तलावात बुडून २० वर्षीय तरुणाचा मृत्यू झाल्याची दुर्देवी घटना सोमवारी (दि.१६) सकाळी घडली.

धार्मिक विधीसाठी तलावात उतरलेल्या या तरुणाला पाण्याच्या खोलीचा अंदाज न आल्याने तो बुडाल्याचे सांगण्यात येत आहे. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दल आणि आपत्ती व्यवस्थापन पथकाने शोधमोहीम सुरू केली. सुमारे ४५ मिनिटांच्या प्रयत्नांनंतर तरुणाचा मृतदेह तलावातून बाहेर काढण्यात आला. माहितीनुसार, मृत तरुणाचे नाव प्रदीप गुलाब विश्वकर्मा (वय २०) असे असून तो कळवा येथील भास्कर नगरमधील यादव चाळीत राहत होता. सोमवारी सकाळी सुमारे ६.३० वाजण्याच्या सुमारास कळवा पूर्वेकडील मफतलाल कंपाऊंड परिसरातील रेल्वे स्थानकाजवळ असलेल्या तलावात ही दुर्घटना घडली. छठपूजेच्या विधीसाठी प्रदीप पाण्यात उतरला होता.

मात्र, पाण्याच्या खोलीचा अंदाज न आल्याने तो बुडाल्याची माहिती समोर आली आहे.




देशाची बदनामी केलीत तर ३० वर्षे सत्ता मिळणार नाही

अमित शहा यांचे राहुल गांधींवर टीकास्त्र

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

पुणे – काँग्रेसचे नेते राहुल गांधी आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर भारताची आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची बदनामी करीत आहेत. काँग्रेस कार्यकर्त्यांनी त्यांचे अनुकरण केल्यास पुढील ३० वर्षे काँग्रेसला सत्ता मिळणार नाही, असा हल्लाबोल केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी रविवारी केला. राहुल गांधींना सत्ता हवी असेल तर त्यांनी परदेश दौरे थांबवून भारतातील गावांमध्ये जाऊन जनतेत काम करायला हवे, असा सल्लाही त्यांनी दिला.



पुण्यात ११० एकर जागेवर बंद पडलेल्या नॅशनल हेव्ही इंजिनिअरिंग कोऑपरेटिव्ह लिमिटेड या कारखान्याचे पुनरुज्जीवन, 'भारत टॅक्सी' या सहकार क्षेत्रातील पहिल्या टॅक्सी सेवेचा प्रारंभ आणि केंद्रीय बहुराज्यीय सहकार निबंधकांच्या पश्चिम विभागीय कार्यालयाचे उद्घाटन अशा महत्त्वपूर्ण प्रकल्पांची पायाभरणी व लोकार्पण शहा यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, केंद्रीय राज्यमंत्री कृष्णपाल गुर्जर, सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, मंत्री चंद्रकांत दादा पाटील, आमदार माधुरी मिसाळ आदी यावेळी उपस्थित होते. देशातील लोकशाहीची आणि पंतप्रधानांची बदनामी करणाऱ्या राहुल गांधींना आणि त्यांच्या पक्षाला जनता योग्य ते उत्तर देईल असे शहा म्हणाले.

काँग्रेसच्या राजकीय धोरणांवर प्रहार करताना शहा म्हणाले की, काँग्रेसने पराभवाच्या नैराश्यातूनच हैदराबाद येथे 'भारत समिट २०२६' परिषद भरवली होती.

या परिषदेत डाव्या विचारसरणीच्या प्रचारकांना बोलावून राहुल गांधींनी आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर भारतविरोधी विचार मांडले आणि भारताची विकासगाथा व लोकशाही प्रतिमा मलीन करण्याचा प्रयत्न केला. परदेशात जाऊन आपल्याच देशावर आणि पंतप्रधानांवर टीका करून सत्ता मिळत नाही; राहुल गांधींनी भारतातील गावांमध्ये जाऊन जनतेत काम करायला हवे, असा टोलाही त्यांनी लगावला.


राष्ट्रवादी विलीनीकरणाच्या चर्चांना अखेर पूर्णविराम

सुप्रिया सुळे यांच्या स्पष्टोक्तीने चित्र स्पष्ट

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

मुंबई – राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे ज्या दिवशी निधन झाले त्याच दिवशी राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांच्या विलीनीकरणाला पूर्णविराम मिळाला, असे राष्ट्रवादी काँग्रेसच्या (शप गट) नेत्या सुप्रिया सुळे यांनी शनिवारी जाहीर केले. आपला पक्ष भाजपप्रणित रालोआत (एनडीए) सहभागी होणार असल्याच्या चर्चाही त्यांनी फेटाळून लावल्या.

राष्ट्रवादी काँग्रेस (शप) आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस (अप) हे दोन्ही गट पुन्हा एकत्र येणार असल्याच्या चर्चांनी जोर धरला होता. या पार्श्वभूमीवर सुप्रिया सुळे यांनी भूमिका स्पष्ट केली.



माझे बंधू अजित पवार हयात असताना दोन्ही पक्षांच्या विलीनीकरणाबाबत चर्चा सुरू होती. त्यासाठी एक तारीखही निश्चित केली होती. मात्र, ज्या दिवशी माझ्या भावाचे निधन झाले, त्याच दिवशी माझ्यासाठी आणि आमच्या पक्षासाठी विलीनीकरणाच्या विषयाला पूर्णविराम मिळाला, असे सुळे यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

रालोआत जाण्याबाबत कोणतीही चर्चा झालेली नाही. जर एखाद्या गोष्टीची सुरुवातच झालेली नाही, तर तिला पूर्णविराम देण्याचा प्रश्नच कुठे येतो?, असे त्यांनी स्पष्ट केले.

तापमान

	कमाल	किमान
अमरावती	२९	२४
यवतमाळ	२८	२१
अकोला	२७	२४
वाशिम	२८	२३
बुलढाण	२७	२२
वर्धा	३०	२३
नागपूर	२९	२४
चंद्रपुर	२९	२५
गडचिरोली	२८	२३
नाशिक	२६	२२
पुणे	३०	२१

नगरपरिषद कार्यालय येथे भगवान बिरसा मुंडा यांना अभिवादन

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

शेंदुरजनाघाट – नगरपरिषद कार्यालय येथे भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.



यावेळी नगराध्यक्ष सुवर्णा वरखेडे यांचे हस्ते भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला व अभिवादन करण्यात आले.

या कार्यक्रमाला महिला व बालकल्याण सभापती प्रिया नेपाल पाटील, महिला व बालकल्याण उपसभापती माधुरी माहुरे, नगरसेवक पवन मोघे, शेख नासिर, शेख बशीर, विजय चौधरी, नेपाल पाटील यांच्यासह नगरपरिषदेचे कर्मचारी दीपक दवंडे, विद्या धवणे, अतुल जोगेकर व इतर कर्मचारी उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी भगवान बिरसा मुंडा यांच्या महान कार्याचे स्मरण करुन त्यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन केले.

स्व.माणिकलालजी गांधी जागृत विद्यालय येथे

क्रांतीसुर्य महामानव बिरसा मुंडा यांची जयंती

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

वरुड – स्थानिक स्व.माणिकलालजी गांधी जागृत विद्यालय येथे क्रांतीसुर्य महामानव बिरसा मुंडा यांची १५१ वी जयंती साजरी करण्यात आली.



यावेळी बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे पूजन आणि हार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. मुख्याध्यापक विजय आडे, उपमुख्याध्यापिका माधुरी मेश्राम, पर्यवेक्षक प्रशांत वडे तसेच सर्व शिक्षक शिक्षिका शिक्षकेत्तर कर्मचारी याप्रसंगी उपस्थित होते. बिरसा मुंडा यांनी सशस्त्र लढा उभारून आणि स्वराज्याची घोषणा करून इंग्रज शासनापुढे एक शशस्त आव्हान उभे केले स्वातंत्र्याच्या उदात्त मूल्यांसाठी जीवनाच्या अल्पशा आयुष्यात अखेरपर्यंत संघर्ष त्यांनी केला, असे विचार याप्रसंगी मान्यवरांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे नियोजन सहाय्यक शिक्षक सुनील वटके सुनील उईके, मीनल नागले आणि व्हि.व्हि.आमले, चतुर्थ कर्मचारी दिलीप मुंदावणे आणि अक्षय धुताले यांनी केले होते.

कोल्हापुरात राज्यातील पहिला आरोग्य प्रकल्प, आरोग्य मंत्र्यांच्या हस्ते आज उद्घाटन

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

मुंबई – सार्वजनिक आरोग्य संस्था मध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) वापर करून आरोग्य व्यवस्थेची गुणवत्ता, पारदर्शकता आणि कार्यक्षमता वाढविण्याच्या दृष्टीने कोल्हापूर जिल्ह्यात राज्यातील पहिला 'महा-पल्स एआय' प्रकल्प राबविण्यात येत आहे. विशेष म्हणजे आरोग्य संस्थांवर एआयची नजर असणार आहे. राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री तथा कोल्हापूर जिल्ह्याचे पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या संकल्पनेतून आकाराला येणाऱ्या या प्रकल्पाचे औपचारिक उद्घाटन सोमवारी रेसिडेन्सी क्लब, कोल्हापूर येथे त्यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. कोल्हापूर जिल्हा नियोजन समितीच्या नाविन्यपूर्ण उपक्रमांतर्गत या प्रकल्पासाठी तरतूद करण्यात आली आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या आरोग्य सेवांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रत्यक्ष वापर करणारा हा राज्यातील पहिला जिल्हास्तरीय प्रकल्प ठरणार आहे. आरोग्य विभाग व जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर यांच्या पुढाकाराने तसेच आयआयटी मंडीच्या सहकार्याने याची अंमलबजावणी करण्यात येत आहे.



रुग्णालयांच्या कामकाजावर देखरेख या प्रणालीद्वारे रुग्णालयांमधील डॉक्टरांची उपस्थिती, रुग्णांची गर्दी, रांग व्यवस्थापन, स्वच्छता, हाऊसकीपिंग तसेच आपत्कालीन घटनांवर कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून लक्ष ठेवले जाणार आहे. एखादा रुग्ण अचानक कोसळणे, रुग्णालय परिसरात आग लागणे किंवा धूर निर्माण होणे यांसारख्या घटनांची प्रणाली तत्काळ ओळख करून संबंधित अधिकाऱ्यांना अलर्ट पाठवेल.

जागृत विद्यालयाच्या इयत्ता दहावीच्या १९९१ च्या माजी विद्यार्थ्यांच्या

'जागृत गोल्डन बॅच' चा स्नेहमिलन सोहळा उत्साहात

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

वरुड – शहरातील जागृत विद्यालयाच्या इयत्ता दहावीच्या १९९१ च्या माजी विद्यार्थ्यांचा 'जागृत गोल्डन बॅच १९९१' चा स्नेहमिलन सोहळा शहरातील येथील हॉटेल श्रीकृपा येथे मोठ्या उत्साहात आणि आनंदी वातावरणात पार पडला. तब्बल अनेक वर्षांनंतर एकत्र आलेल्या माजी विद्यार्थ्यांनी शालेय जीवनातील जुन्या आठवणींना उजाळा देत मैत्रीच्या नात्याला नव्याने उजाळा दिला. जीवनाच्या वेगवेगळ्या क्षेत्रांत कार्यरत असलेले मित्र-मैत्रिणी एकत्र आल्याने संपूर्ण वातावरण आनंदमय झाले होते.



यावेळी शाळेतील वर्गखोल्या, शिक्षकांचे मार्गदर्शन, मित्रांसोबत केलेल्या गमतीजमती, खेळ आणि शालेय जीवनातील अविस्मरणीय प्रसंगांच्या आठवणींना उजाळा देण्यात आला. अनेक वर्षांचा कालावधी लोटला असला तरी एकमेकांप्रती असलेली आपुलकी, जिव्हाळा आणि मैत्रीचा ओलावा आजही कायम असल्याचे या स्नेहमिलनातून दिसून आले.

एकमेकांच्या सुख-दुःखांची विचारपूस करीत सर्वांनी मनमोकळ्या गप्पा मारल्या. जुन्या आठवणींमध्ये रममाण होत हास्यविनोद, आनंद आणि उत्साहात हा सोहळा संस्मरणीय ठरला. विद्यार्थिदशेत निर्माण झालेले मैत्रीचे नाते काळाच्या ओघातही किती घट्ट राहू शकते, याचा सुंदर प्रत्यय 'जागृत गोल्डन बॅच १९९१'च्या या स्नेहमिलन सोहळ्याने घडवुन आणला. विशेष म्हणजे 'जागृत गोल्डन बॅच १९९१' चा स्नेहमिलन सोहळा तिसऱ्यांदा आयोजीत करण्यात आला होता.


या स्नेहमिलन सोहळ्याला नरेंद्र खेरडे, मनोज भोपळे, महेश्वर पवार, भुषण महात्मे, सुरेंद्र इंगळे, सुधिर टेकाडे, दिपक अतकरे, दिपेश वानखडे, हरिश्चंद्र अकर्ते, सुधिर श्रीराव, लक्ष्मीकांत दळवी, विजय सुरजूसे, संदीप केंडे, अंशुमन मानकर, सतिश नेरकर, अमित खेरडे, वैभव विरखरे, डॉ.सिध्दार्थ देवळे, आनंद खेरडे, चंद्रकांत भड, रश्मी चौधरी, डॉ.वैशाली खेरडे, वैशाली टोंगसे, रुपाली काळे, निलिमा काळे, नंद मडघे, प्रेमा सावरकर, डॉ.मनिषा विटाळकर, सविता जैस्वाल, वैशाली तरार आदी वर्गमित्र आणि वर्गमैत्रिणींनी हजेरी लावली होती.

आदिवासींचा मताधिकारही नाकारला

पंतप्रधान मोदी यांचा काँग्रेसवर आरोप

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

नवी दिल्ली – नक्षल हिंसाचाराचा सर्वाधिक फटका आदिवासींना बसला. आधीच्या सरकारने माओवाद्यांच्या प्रभावाखालील भागांमध्ये आदिवासींना मतदानाच्या हक्कापासूनही वंचित ठेवले होते, असा आरोप पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी केला.



गडचिरोली येथे आदिवासी स्वातंत्र्यसेनानी बिरसा मुंडा यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त आयोजित 'जनजातीय गौरव दिना'च्या कार्यक्रमात पंतप्रधान दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून बोलत होते.

माओवाद्यांनी आदिवासी मुले, तरुण आणि आदिवासी महिलांचे अपहरण केले, तेव्हाही पूर्वीची सरकारांनी बघ्याची भूमिका घेतली, अशी टीका मोदींनी काँग्रेसचा नामोल्लेख टाळून केली.

गेल्या १२ ते १३ वर्षांत ५० कोटी देशवासीय हलाखीच्या गरिबीतून बाहेर आल्याचा दावा मोदी यांनी केला. स्वातंत्र्यानंतर भारताने मिळवलेल्या सर्वांत मोठ्या यशांपैकी हे एक असल्याची पुष्टीही त्यांनी जोडली. जागतिक बँकेच्या अहवालाचा दाखला देत ते म्हणाले, हे यश समाज आणि नागरिकांच्या सामूहिक प्रयत्नांचे फलित आहे.

त्यात सरकारच्या कल्याणकारी योजनांचाही महत्त्वाचा वाटा आहे.

आदिवासी भागांचा विकास वेगाने करण्यासाठी केंद्र सरकारने पीएम-जनमन योजना आणि धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियानासाठी एक लाख कोटी रुपयांहून अधिक निधी दिला आहे. मूलभूत सुविधांपासून वंचित राहिलेल्या आदिवासी भागांच्या विकासाला सरकारने प्राधान्य दिले आहे, असे मोदी यांनी सांगितले.

गरिबांना चार कोटींहून अधिक पक्की घरे बांधून देण्यात आली आहेत. स्वातंत्र्यानंतर अनेक दशके वीज पोहोचली नव्हती, अशा १८ हजार गावांमध्ये वीजपुरवठा सुरू करण्यात आला आहे.

मोदी म्हणाले, १०० हून अधिक आकांक्षी जिल्हे आणि ५०० पेक्षा अधिक आकांक्षी तालुक्यांमध्ये विशेष विकास अभियान राबवण्यात येत आहे. यापैकी अनेक जिल्हे आणि तालुक्यांमध्ये आदिवासी लोकसंख्या मोठ्या प्रमाणात आहे. शेतीच्या बाबतीत मागे असलेल्या १०० जिल्ह्यांमध्ये 'पीएम धन-धान्य कृषी योजने'च्या माध्यमातून शेतकरी आणि आदिवासी समुदायांसाठी अधिक चांगल्या संधी निर्माण केल्या जातील, असेही पंतप्रधानांनी सांगितले.

संपादकीय

प्रामाणिक प्रयत्नांना उशीर होऊ शकतो, पण अपयश कायमचे नसते.

सहकार चळवळीला सरकारी हस्तक्षेपाचा विळखा!


स्वायत्ततेच्या अभावामुळे भ्रष्टाचार आणि गैरप्रकारांना खतपाणी; सहकार वाचविण्यासाठी राजकीय हस्तक्षेप थांबविण्याची गरज भारतीय अर्थव्यवस्थेत सहकार चळवळीला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. ग्रामीण भागातील शेतकरी, शेतमजूर, लहान व्यावसायिक आणि सर्वसामान्य नागरिकांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचे प्रभावी माध्यम म्हणून सहकार चळवळ उभी राहिली. एकमेकांच्या सहकार्याने विकास साधणे, आर्थिक व्यवहारात पारदर्शकता ठेवणे आणि लोकसहभागातून संस्थांचा कारभार चालविणे, हा सहकाराचा मूळ उद्देश होता. मात्र, आज या चळवळीची वाटचाल पाहिली असता सहकाराच्या मूळ संकल्पनेलाच ग्रहण लागल्याचे चित्र दिसून येत आहे. सरकारचा वाढता हस्तक्षेप, राजकीय हस्तक्षेप आणि संस्थांच्या स्वायत्ततेवर येणारी मर्यादा यामुळे अनेक सहकारी संस्थांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

सहकारी संस्था या सभासदांच्या मालकीच्या आणि सभासदांच्या हितासाठी चालणाऱ्या संस्था आहेत. त्यामुळे त्यांच्या निर्णयप्रक्रियेत सभासदांचा सहभाग आणि संचालक मंडळाची जबाबदारी महत्त्वाची असते. परंतु प्रत्यक्षात अनेक ठिकाणी संस्थांच्या कारभारात राजकीय दबाव वाढताना दिसतो. संस्थांच्या निवडणुका, संचालक मंडळाची नियुक्ती, कर्जवाटप, आर्थिक निर्णय आणि प्रशासकीय कामकाज अशा विविध बाबींमध्ये बाह्य हस्तक्षेप वाढल्यास संस्थांच्या स्वायत्ततेला बाधा पोहोचते. परिणामी संस्थेच्या हितापेक्षा राजकीय सोयी आणि वैयक्तिक स्वार्थाला प्राधान्य मिळण्याची शक्यता निर्माण होते. सहकार क्षेत्रात सरकारची भूमिका ही मार्गदर्शक, नियामक आणि आवश्यक तेथे नियंत्रण ठेवणारी असणे अपेक्षित आहे. मात्र, नियंत्रण आणि हस्तक्षेप यामधील सीमारेषा पुसली गेल्यास संस्थांच्या कामकाजावर त्याचा विपरीत परिणाम होतो. काही संस्थांमध्ये राजकीय हस्तक्षेपातून निर्णय घेतले जातात, तर काही ठिकाणी आर्थिक शिस्तीपेक्षा राजकीय गणितांना अधिक महत्त्व दिले जाते. अशा परिस्थितीत गैरव्यवहारांना आळा घालण्याऐवजी त्यांना अप्रत्यक्षपणे प्रोत्साहन मिळण्याचा धोका निर्माण होतो. सहकारी बँका, पतसंस्था, साखर कारखाने, दूध संघ आणि विविध सहकारी संस्थांचे अस्तित्व ग्रामीण अर्थव्यवस्थेसाठी महत्त्वाचे आहे. या संस्थांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना कर्जपुरवठा, आर्थिक व्यवहार, शेतीपूरक व्यवसाय आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात. मात्र, संस्थांमध्ये आर्थिक अनियमितता, नियमबाह्य कर्जवाटप, थकबाकीचे वाढते प्रमाण, मनमानी निर्णय आणि लेखापरीक्षणातील त्रुटी आढळल्यास त्याचा सर्वाधिक फटका सामान्य सभासदांना बसतो. ज्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी या संस्था निर्माण झाल्या, तेच सभासद अनेकदा अडचणीत सापडतात.



विश्व प्रीमेच्युरिटी दिन : वेळेआधी जन्मलेल्या नाजूक जीवांची लढाई आणि आशेचे नवे क्षितिज

सन २००२ मध्ये आस्था मदर अँड चाइल्ड केअरची स्थापना करताना माझ्या मनात एकच ध्येय होते: गंभीर नवजात शिशू, वेळेआधी जन्मलेली व कमी वजनाची बाळे यांना जिवंत ठेवणे, त्यांना सुरक्षित करणे आणि त्यांना आयुष्याचे नवे पान भेट देणे. मागील २५ वर्षांत आम्ही २५,००० हून अधिक नवजात शिशूंचे उपचार यशस्वीपणे केले आहेत. यात २६ आठवड्यात जन्मलेले, फक्त ४९० ग्रॅम वजनाचे बाळ पूर्णपणे निरोगी करणे हे आमच्यासाठी आजही अतुलनीय यश राहिले आहे. सुरुवातीपासूनच आमचा प्रयत्न राहिला आहे की नवजात शिशूंना उच्च दर्जाची, आधुनिक आणि मानवीय एनआयसीयू केअर सर्वांसाठी किफायतशीर आणि सहज उपलब्ध करुन द्यावी.



भारतामध्ये वेळेआधी जन्म ही एक गंभीर आणि मोठी आरोग्य समस्या बनली आहे. देशातील सुमारे १३ ते १५ टक्के बाळे प्रीमेच्युर जन्मतात ही संख्या जगातील सर्वाधिक आहे. दरवर्षी सुमारे ३५ लाख प्रीमेच्युर बाळे जन्मतात आणि त्यापैकी जवळपास ३ लाख बाळांचे निधन होते. जे बाळे वाचतात त्यांना आयुष्यभर अनेक समस्यांची साथ मिळू शकते शारीरिक वाढ मंदावणे, शिकण्यात अडचणी, भाषण विकासात विलंब, अटेंशन डेफिसिट, ऑटिझमसारखी लक्षणे, सेरेब्रल पाल्सी, तसेच दीर्घकालीन आरोग्य समस्या जसे अंडरवेट, स्टंटिंग, ओबेसिटी आणि नॉन-कम्युनिकेबल डिसीजेस. या सर्वांचा परिणाम फक्त बाळावरच नाही तर संपूर्ण कुटुंब, समाज आणि आरोग्य व्यवस्थेवर होतो.

बाळे वेळेआधी का जन्मतात याची कारणे विविध आहेत. मातृवय वाढणे किंवा खूप कमी वयात गर्भधारणा होणे, आईचे वजन कमी असणे किंवा जास्त असणे, उच्च रक्तदाब, डायबिटीस, थायरॉईड विकार, गर्भातील संसर्ग, दोन गर्भधारणांमधील कमी अंतर, मानसिक ताण, धूम्रपान, मद्यपान आणि चुकीची जीवनशैली ही सर्व कारणे प्रीमेच्युरिटीची शक्यता वाढवतात. अलीकडील काळात आयव्हीएफ आणि इतर infertility treatments मुळे जुळ्या आणि मल्टीपल गर्भधारणांचे प्रमाण वाढत आहे आणि अशा गर्भधारणांमध्ये आई आणि बाळ दोघांनाही अधिक धोका निर्माण होतो. पेरेंट्सने यासाठी डळपसश्रश एलौी ढीरपीषशी, संतुलित आहार, नियमित तपासण्या आणि तज्ज्ञ मार्गदर्शन घेणे अत्यावश्यक आहे.

जर बाळ वेळेआधी जन्मले तर जन्मानंतर अनेक गंभीर अडचणी येऊ शकतात. अशा बाळांची फुफ्फुसे पूर्ण विकसित नसल्याने त्यांना श्वास घेण्यात त्रास होतो. शरीराचे तापमान कमी होते, ब्लड शुगर घसरतो, संक्रमणाचा धोका वाढतो, मेंदूमध्ये रक्तस्राव होऊ शकतो, डोळ्यांची रेटिना पूर्ण विकसित होत नाही, पिवळे पडणे आणि पचनाच्या समस्या निर्माण होतात. बाळ जितके लवकर जन्मते, तितक्या समस्या अधिक गुंतागुंतीच्या होतात.

अशा परिस्थितीत पालकांनी घाबरु नये. योग्य वेळी योग्य निर्णय घेणे हेच बाळाच्या जीवाचे रक्षण करु शकते. प्रीटरम डिलिव्हरीची शक्यता असल्यास आईला वेळेवर स्टेरॉइड इंजेक्शन देणे, नवजात तज्ज्ञ असलेल्या छखउण सुविधेचा शोध घेणे आणि बाळाच्या उपचारांविषयी आधीच समुपदेशन घेणे आवश्यक आहे. छखउण मध्ये बाळाला व्हेंटिलेटर वा उझअझ सपोर्ट, तापमान नियंत्रण, संक्रमण संरक्षण, मेंदू व डोळ्यांचे निरीक्षण, आईच्या दुधाची व्यवस्था, कंगारु मदर केअर आणि पालकांचा सक्रिय सहभाग हे सर्व उपचार मिळाल्यास भविष्यातील विकलांगता मोठ्या प्रमाणात कमी करता येते.

अस्पतालातून डिस्चार्ज देताना पालकांना फीडिंग, वजन वाढ, डोळे-कान-मेंदू तपासणी, औषधे, लसीकरण आणि फॉलो-अप याबद्दल पूर्ण माहिती दिली पाहिजे. घरी गेल्यावर पहिले दोन वर्षे जीवनातील सर्वात महत्वाची योग्य पोषण, संक्रमणापासून संरक्षण, विकासाचे निरीक्षण आणि डॉक्टरांची नियमित भेट अत्यावश्यक असते. कारण या दोन वर्षांतच बाळाच्या भविष्याची पायाभरणी होते.

प्रीमेच्युरिटीचा परिणाम फक्त बाळापुरता मर्यादित राहत नाही. पालकांमध्ये प्रचंड मानसिक ताण, चिंता, नैराश्य, कुटुंबातील दैनंदिन जीवनात अडथळे, आर्थिक ओझे, रुग्णालयाच्या वारंवारच्या भेटी आणि सामाजिक अलगाव ही सर्व आव्हाने बाळाच्या जन्मानंतर अनेक महिने सुरुच राहतात. समाजाच्या दृष्टीनेही प्रीमेच्युरिटी आरोग्य व्यवस्थेवर मोठा आर्थिक बोजा टाकते आणि विशेष शिक्षण तसेच पुनर्वसनाच्या गरजा वाढवते.

विश्व प्रीमेच्युरिटी दिनानिमित्त माझा समाज आणि पालकांना संदेश असा आहे प्रीमेच्युरिटी मोठ्या प्रमाणात टाळता येऊ शकते. गर्भधारणेपूर्वी आरोग्य तपासणी, योग्य वजन, संतुलित आहार, ताण कमी करणे, व्यसनांचा त्याग, वेळेवर अछउ तपासण्या आणि दोन गर्भांमध्ये योग्य अंतर ठेवणे हे सर्व उपाय लाखो मुलांचे प्राण वाचवू शकतात. आणि जरी बाळ वेळेआधी जन्मले तरी योग्य छखउण केअर, आईचे दूध आणि पहिल्या १००० दिवसांची योग्य काळजी त्याचे आयुष्य पूर्णपणे बदलू शकते.

प्रत्येक बाळाला जीवनाचा पूर्ण अधिकार आहे. योग्य माहिती, योग्य निर्णय आणि योग्य वेळी दिलेली योग्य काळजीहीच त्याच्या उज्ज्वल भविष्याची गुरुकिल्ली आहे.



डॉ.प्रवीण खापेकर
एम डी नवजात शिशु एवं बाल रोग विशेषज्ञ
आस्था मदर एंड चाइल्ड केयर, रामदास पेट नागपुर
मो.९८८१३७०३७३

महायुतीने एकदिलाने काम करण्याची गरज!

आगामी काळात काँग्रेसला शह द्यायचा असेल, तर भाजप, शिंदे व सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखालील महायुतीने एकदिलाने, एकोप्याने काम करणे आवश्यक आहे. तसे चित्र आज तरी दिसत नाही.

राज्यात सध्या महायुतीचे सरकार अस्तित्वात आहे. परंतु गेले काही महिने अंतर्गत वाद उफाळून आला आहे. देवेंद्र फडणवीस यांना आव्हान देण्यात येत असून मित्रपक्ष महाराष्ट्रात भाजपला शह देतात आणि केंद्रात मात्र गुजगोष्टी करत असतात. शिवसेनेचा दसरा मेळावा व त्यानंतर सुरु असलेले वादविवाद हे आता वाढले आहेत. विशेष म्हणजे शिवसेना नेते रामदास कदम, गुलाबराव पाटील, धनगेकर आदींनी भाजपाविरुद्ध आघाडी उघडली आहे. निव्वळ भाजप विरोधीच नाही तर कदम यांनी दुसरा मित्रपक्ष राष्ट्रवादी यालाही आव्हान दिले आहे हे पाहता शिवसेना शिंदे गटाचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या मंडळींना चाप लावला पाहिजे अन्यथा हे सरकार, ही महायुती फार दिवस चालेल असे दिसत नाही.

शिवसेनेचा दसरा मेळावा हा काही अर्थाने उबाठाचे नेते उद्धव ठाकरे यांना शह देणारा असणे आवश्यक होते. परंतु येथे तर चर्चा शिंदे यांच्या मुख्यमंत्री पदाचीच सुरु होती. देवेंद्र फडणवीस यांनी राजीनामा देऊन एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्री करावे अशीच चर्चा जाहीरपणे सुरु होती. रामदास कदम यांनी तर दसरा मेळाव्यातच भाजप या मित्र पक्षावर शरसंधान केले. वास्तविक पाहू गेले तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे तेथे उपस्थित असतांनाही त्यांनी त्यावर प्रतिक्रिया देणे आवश्यक होते; परंतु ती दिली नाही. त्यामुळे कदम आणि गुलाबराव पाटील यांचे बोलविते धनी शिंदेच आहेत की काय अशी चर्चा रंगू लागली होती. आता तर रामदास कदम यांनी अजितदादा यांच्या मृत्यूबाबत मित्र पक्षाचे नेते सुनील तटकरे यांनाच जवळ जवळ आरोपी केले आहे. तटकरे यांना उपमुख्यमंत्री व्हायचे असल्या कारणाने हा अपघात त्यांनी घडवून आणला अशी जाहीर टीका कदम यांनी केली.



वास्तविक पाहू गेले तर कदम यांचे चिरंजीव राज्य मंत्रिमंडळात मंत्री आहेत. त्यांच्याकडे गृह व महसूल हे महत्वाचे राज्यमंत्रीपद आहे. दुसरे चिरंजीव हे प्रदूषण मंडळाचे प्रमुख आहेत असे असतांनाही रामदास कदम हे विरोधी पक्ष नेत्यासारखे बोलत आहेत. हा नुसता मिठाचा खडा नसून भाजप आणि शिवसेना, राष्ट्रवादी आणि सेना यांच्यात पडणारी उभी फूट आहे.

विधानपरिषद निवडणुकीत तर एकमेकांनी एकमेकांचे उमेदवाराचं पाडले. महायुतीचे पाचही उमेदवार निवडून येणे महत्वाचे होते. परंतु ते अवघे दोनच सदस्य निवडून आले. त्यात एक भाजाप व एक शिवसेना असे होते. विशेष म्हणजे शिवसेनेचे माजी मंत्री अब्दुल सत्तार यांनी तर उघडपणे काँग्रेसचा प्रचार करून त्यांचा उमेदवार निवडून आणला. हे एकूण चित्र पाहता महायुतीचे काही खरे नाही अशीच चर्चा उघडपणे सुरु आहे.

महाराष्ट्रात आत्तापर्यंत झालेल्या विधानपरिषद निवडणुका त्यानंतर नगरपरिषद, महानगरपालिका व काही जिल्हा परिषदेचा निवडणूक आखाडा झालाय. त्यात महायुतीला यश मिळाले. परंतु ती स्थिती विधानपरिषद निवडणुकीत दिसून आलेली नाही. नागपूर हा भाजपाचा बालेकिल्ला, तेथे त्यांचा उमेदवार पराभूत व्हावा याची खंत दस्तुरखुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केली. मात्र भाजपने अमरावतीमधील शिवसेनेची सीट जिंकून आणली. धंगेकर या शिवसेना नेत्याने महायुतीच्या उमेदवाराविरुद्ध उघडपणे प्रचार केला. अशा परिस्थिती हे सरकार कसे टिकू शकते ?

दस्तुरखुद्द एकनाथ शिंदेही रागावून कधी मंत्रिमंडळाच्या बैठकीस, सार्वजनिक कार्यक्रमास गैरहजर असतात. जवळचा रास्ता म्हणजे महाबळेश्वर जवळील दरे या गावी तिथे तीन तीन – चार चार दिवस राज्याचे उपमुख्यमंत्री राहतात. ते तिथे कोणाशीही संवाद करीत नाहीत. तीच परिस्थिती या युती सरकारमध्ये घडत आहे. यापूर्वी देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री पदाची शपथ घेत असतांनाच शिंदे हे रुसून बसले होते. आत्ता तर नव्या खेळ्या सुरु झाल्या आहेत. दोन्ही राष्ट्रवादीत एकत्र विलीनीकरण होण्याचे संकेत दिसत आहेत. तर दुसऱ्या बाजूला दोन्ही शिवसेने एकत्र यावे अशी चर्चाही सुरु झाली आहे. त्याला शह म्हणून की काय देवेन्द्र फडणवीस व उद्धव ठाकरे हे एका स्टेजवर आले होते. त्यात जी जुगलबंदी झाली त्यावरून बरीच चर्चा महाराष्ट्रभर रंगली. राज्यात सध्या दुष्काळी परिस्थिती आहे. तेथेही शह काटशहाचे राजकारण सुरु आहे. तेथे एकनाथ शिंदे गटाचे वर्चस्व दाखविण्याचा प्रयत्न केला जात आहे. मंत्रिमंडळातील बहुसंख्य मंत्री शेतकऱ्यांच्या बांधावर आहेत. काही ठिकाणी मंत्री शेतकऱ्यांच्या बरोबर जेवतांना दिसत आहेत.

एकनाथ शिंदे हे मागील अडीच वर्षे मुख्यमंत्री होते. त्यांच्या काळातच विधानसभेच्या निवडणुका झाल्या. भाजपला १३७ जागा आणि शिवसेनेला ६३ जागा मिळाल्या. त्यावेळीही थोडी रस्सीखेच झाली होती. देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री पदाची शपथ घेत असतांना एकनाथ शिंदे हे आपल्या दरे गावी निघून गेले होते. ते शेवटच्या क्षणाला आले. यापूर्वी शिंदे हे मुख्यमंत्री असतांना देवेंद्र फडणवीस यांनी कुठलीही खळखळ केली नव्हती. परंतु आता तर उघडपणे युतीतील उमेदवाराला पराभूत करण्याचे षडयंत्र मित्रपक्षातील काही मंडळींकडून केले जात आहे.

भाजपामध्ये एकनाथ खडसे हे पॉवरफुल नेते होते. ज्यावेळेला महाराष्ट्रात युतीचे सरकार नव्हते त्यावेळी त्यांनी जळगाव व खान्देश भाजपकडे शाबूत ठेवला होता. जळगावमधील लोकसभेच्या दोन्ही जागा, जिल्हा परिषद, जळगाव महापालिका व सर्व सत्तास्थाने ही भाजपाकडे ठेवली होती. परंतु पक्षविरोधी राजकारण होताच ते बाजूला पडले. आजही खडसेंचे वजन हे खान्देशमध्ये आहे. असे असतांना शिवसेनेचे मात्र तसे नाही. जळगावमध्ये त्यावेळी खडसे विरुद्ध गुलाबराव पाटील असे राजकारण होते. आता भाजपचे गिरीश महाजन विरुद्ध शिवसेनेचे नेते असा सामना रंगत आहे. खान्देशमधे नाशिक, धुळे, जळगाव, नंदुरबार हे जिल्हे मोडतात. या पाचही जिल्ह्यात यापूर्वी भाजपाचाच वरचश्माचे होता. परंतु या फुटीमुळे नंदुरबारची व आणखीन एक जागा लोकसभेची पडली. अंतर्गत राजकारण जेव्हा विरोधी होतंय तेव्हा त्या पक्षाला फटका बसतो. मात्र येथे तर उघडपणे एकमेकांच्या विरुद्ध जाहीरपणे मतप्रदर्शन केले जाते.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक – चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

अमरावती ग्रामीण पोलिसांची फरार आरोपींविरुद्ध धडक कारवाई : दोघांना अटक

मोर्शीतील २०१५ पासून फरार असलेला घरफोडीतील आरोपी घाटलाडकीतून जेरबंद : दुसऱ्या आरोपीला मध्यप्रदेशातून अटक

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

मोर्शी – अमरावती ग्रामीण पोलिसांनी पाहिजे व फरार आरोपींचा शोध घेण्यासाठी राबविलेल्या विशेष मोहिमेत दोन फरार आरोपींना अटक करण्यात यश मिळिवले आहे. यामध्ये मोर्शी पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या घरफोडीच्या गुन्ह्यात सन २०१५ पासून फरार असलेल्या आरोपीला घाटलाडकी येथून ताब्यात घेण्यात आले, तर दुसऱ्या आरोपीला मध्यप्रदेशातील पांढुर्णा येथून अटक करण्यात आली.

पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेमार्फत पाहिजे व फरार आरोपींचा शोध घेण्याची विशेष मोहीम राबविण्यात येत आहे.



या मोहिमेदरम्यान १३ नोव्हेंबर २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक मोर्शी पोलीस ठाण्याच्या हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे मोहम्मद साबीर उर्फ मोहम्मद शानू वल्द मोहम्मद शफी (वय ४५, रा.घाटलाडकी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती) याला घाटलाडकी येथून ताब्यात घेतले.

सदर आरोपी मोर्शी पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्हा क्रमांक १४४/२०१५, कलम ४५७ व ३८० भादंवि अंतर्गत घरफोडीच्या गुन्ह्यात सन २०१५ पासून पाहिजे आरोपी होता.

दुसऱ्या कारवाईत वरूड पोलीस ठाण्यातील तीन घरफोडीच्या गुन्ह्यांत पाहिजे असलेला आरोपी प्रवीण प्रकाश गजभिये (वय ३३, रा. राजुरा, सध्या रा. घुग्घुसकर) हा मध्यप्रदेशातील पांढुर्णा येथे असल्याची गोपनीय माहिती मिळाली. त्यानुसार त्याला पांढुर्णा येथून अटक करण्यात आली. हा आरोपी अमरावती ग्रामीण जिल्ह्यातील सहा पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील एकूण १७ गुन्ह्यांत पाहिजे असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

ही कारवाई पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या आदेशाने अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेबाड यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अशोक लांडे तसेच वरूडचे ठाणेदार दिनेश चव्हाण यांच्या नेतृत्वात करण्यात आली.

या कारवाईत पोलीस उपनिरीक्षक आकाश शिवणकर, पोलीस अंमलदार रूपेश गावंडे, शांताराम सोनोनें आणि विवेक घोरमाडे यांनी सहभाग घेतला.

अनेक वर्षांपासून फरार असलेल्या आरोपींना अटक करण्यात अमरावती ग्रामीण पोलिसांना यश आले असून, पाहिजे व फरार आरोपींचा शोध घेण्याची मोहीम यापुढेही प्रभावीपणे सुरू राहणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले.

निवासी वस्त्यांतील उद्योग स्थलांतरित करण्यासाठी धोरण

एमआयडीसीची उद्योगांना सवलत, अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक देणार

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



मुंबई – औद्योगिक क्षेत्रांच्या आसपास राहणाऱ्या नागरिकांना लवकरच दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

निवासी वस्त्यांच्या जवळ असलेल्या उद्योगांना तेथून अन्य औद्योगिक क्षेत्रांत स्थलांतरित करण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) प्रोत्साहनपर धोरण तयार करीत आहे.

उद्योगांनी सध्याची जागा सोडून नव्या औद्योगिक ठिकाणी स्थलांतर करावे, यासाठी विविध सवलतींचे पॅकेज देण्याचा महामंडळाचा विचार आहे. वेगाने होत असलेल्या शहरीकरणामुळे पूर्वी शहराबाहेर असलेले औद्योगिक प्रकल्प आता निवासी इमारतींच्या अगदी जवळ आले आहेत. विशेषतः मुंबई महानगर प्रदेशातील अनेक जुन्या एमआयडीसी औद्योगिक वसाहतींच्या परिसरात मोठ्या प्रमाणावर गृहसंकुले उभी राहिली आहेत. त्यामुळे कारखान्यांच्या आसपास राहणाऱ्या नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे. कारखान्यांना लागणाऱ्या आगी, रासायनिक गळती आणि स्फोटांच्या घटनांमुळे औद्योगिक प्रकल्पांच्या जवळ राहण्यातील धोके अधोरेखित झाले आहेत.

कमल कुंडलकर यांचे निधन

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



वरुड – पेठ मांगरुळी येथील रहिवासी तथा कृषिरत्न प्रविण रामकृष्ण कुंडलकर यांच्या मातोश्री श्रीमती कमल रामकृष्ण कुंडलकर यांचे वयाच्या ६५ व्या वर्षी काल (ता.१३) अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले.

त्यांच्या पश्चात कुटूंबिय व आप्तस्वकीय असा परिवार आहे.

पेठ मांगरुळी येथील मोक्षधाम येथे स्वकीय, आप्तेष्ट, नातेवाईक आणि ग्रामस्थांच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

शेषराव अंबाडकर यांचे निधन

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



वरुड – शहरातील जेष्ठ नागरिक तथा सेवानिवृत्त शिक्षक शेषराव मोतीराम अंबाडकर यांचे काल (ता.१३) दुपारी २.५० वाजता दीर्घ आजाराने दुःखद निधन झाले. वरुड शहरातील ते एक आदर्श शिक्षक होते. त्यांच्या पश्चात २ मुले, २ मुली, पत्नी, सुना, नातवंड असा मोठा परिवार आहे.

त्यांच्या पार्थिवावर आज शहरातील मोक्षधाम येथे स्वकीय, आप्तेष्ट, नातेवाईक आणि शहरवासियांच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

चिखलदरा नगर परिषदेचे उपाध्यक्ष प्रमोद नाईक यांना मातृशोक!

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



चिखलदरा – चिखलदरा नगर परिषदेचे उपाध्यक्ष प्रमोद पंजाबराव नाईक यांच्या मातोश्री तथा माजी नगराध्यक्ष सौ. ज्योतीताई पंजाबराव नाईक (वय ६३) यांचे रविवार, १५ नोव्हेंबर रोजी रात्री ९.३० वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाने संपूर्ण चिखलदरा शहरात शोककळा पसरली आहे.

गेल्या तीन दिवसांपासून त्यांच्यावर अमरावती येथील झेनिथ हॉस्पिटलमध्ये उपचार सुरु होते. त्यांच्या प्रकृतीची माहिती मिळताच नातेवाईक, मित्रपरिवार आणि नागरिकांनी रुग्णालयात गर्दी केली होती. मात्र, उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. ज्योती नाईक यांनी नगराध्यक्षपदाच्या कार्यकाळात चिखलदरा शहराच्या विकासासाठी, मूलभूत सुविधांच्या उभारणीसाठी तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी उल्लेखनीय कार्य केले होते. सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या आणि नागरिकांशी जिव्हाळ्याचे संबंध ठेवणाऱ्या व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांची ओळख होती. त्यांच्या निधनाने नाईक कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून चिखलदरा शहराने एक अनुभवी लोकप्रतिनिधी गमावल्याची भावना व्यक्त होत आहे. त्यांच्या निधनाबद्दल राजकीय, सामाजिक क्षेत्रातून शोकसंवेदना व्यक्त करण्यात येत आहेत.

उत्तर प्रदेश निवडणुकीसाठी भाजपाची तयारी सुरु, मथुरेच्या बैठकीत पुढची रणनिती ठरणार

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

मुंबई – उत्तर प्रदेशसह पाच राज्यांच्या निवडणुकीच्या तारखा अद्याप जाहीर झालेल्या नाहीत. पुढच्या वर्षी अर्थात २०२७ च्या फेब्रुवारी मार्चमध्ये या निवडणुका होण्याची शक्यता आहे. पण भारतीय जनता पार्टीने या निवडणुकीसाठी आतापासूनच रणनिती आखण्यास सुरूवात केली आहे. या पार्श्वभूमीवर मथुरेत भाजपा कार्यकारिणीची एक महत्त्वाची बैठक पार पडणार आहे. यासाठी ३८ ते ४० सदस्यांची एक कोर टीम तयार केली आहे. या बैठकीत मुख्यमंत्री,दोन्ही उपमुख्यमंत्री, पार्टी प्रभारी, सर्व सह-प्रभारी, प्रदेश अध्यक्ष, महामंत्री, सहा महामंत्री, सहा समन्वयक, पाच पूर्व प्रदेश अध्यक्ष, प्रदेश उपाध्यक्ष, माजी मंत्री आणि विभागीय अध्यक्ष यांचा समावेश आहे. निवडणूक व्यवस्थापनात सहभागी असलेले एक किंवा दोन सरकारी मंत्रीही या बैठकीला उपस्थित राहतील. तर भाजपा अध्यक्ष नितीन नवीन १७ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या बैठकीला उपस्थित राहतील. भाजपाचे वरिष्ठ नेतेही राहणार उपस्थित भाजपचे जिल्हा माध्यम प्रभारी श्याम चतुर्वेदी यांनी



वृत्तसंस्थाशी बोलताना सांगितले की, या बैठकीला अनेक प्रमुख नेते उपस्थित राहण्याची शक्यता आहे. यामध्ये राष्ट्रीय स्तरावरील नेते नितीन नवीन, राष्ट्रीय सरचिटणीस बी. एल. संतोष, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, प्रदेशाध्यक्ष आणि केंद्रीय अर्थ राज्यमंत्री पंकज चौधरी, राज्य प्रभारी विनोद तावडे, उपमुख्यमंत्री केशव प्रसाद मौर्य आणि ब्रजेश पाठक, तसेच सहा संघटनात्मक विभागांतील राज्यमंत्री आणि पक्षाचे इतर अधिकारी यांचा समावेश आहे.

ब्रिटीश शाही जोडपे प्रिन्स विल्यम आणि प्रिन्सेस कॅथरीन यांची मुंबईत सचिन तेंडुलकरसोबत 'गल्ली क्रिकेट'ची धमाल

शाळकरी मुलांसोबत रंगला सामना!

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

मुंबई – मुंबईच्या बॅलार्ड इस्टेट भागात सोमवारी सकाळी एक अतिशय सुंदर आणि न विसरता येण्यासारखा प्रसंग पाहायला मिळाला. ब्रिटनचे प्रिन्स विल्यम आणि प्रिन्सेस कॅथरीन यांनी भारताचे क्रिकेट सम्राट सचिन तेंडुलकर यांच्यासोबत मुंबईतील शाळकरी मुलांबरोबर 'गल्ली क्रिकेट' खेळण्याचा आनंद घेतला. हा खास कार्यक्रम आपल्या पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी आणि वसुंधरेबद्दल लोकांमध्ये जनजागृती निर्माण करण्यासाठी आयोजित करण्यात आला होता. सुरुवातीला प्रिन्स विल्यम यांनी बॅट हातात घेऊन जोरदार फटकेबाजी केली. त्यानंतर त्यांनी प्रिन्सेस कॅथरीन आणि चक्क 'मास्टर



ब्लास्टर' सचिन तेंडुलकर यांनाही गोलंदाजी केली. सचिन तेंडुलकर यांनीही क्रीझवर उतरून आपल्या नेहमीच्या क्लासिक स्टाईलमध्ये फटके मारत उपस्थित सर्वांची मने जिंकून घेतली.

मजेशीर गप्पा आणि मार्गदर्शनाचे क्षण प्रत्यक्ष खेळ सुरू होण्यापूर्वी सचिन तेंडुलकर आणि या ब्रिटिश शाही जोडप्यामध्ये एक खूप छान आणि हसतखेळत संवाद झाला. सचिनजी आपल्या नेहमीच्या उत्साही अंदाजात हाताचे हावभाव करून प्रिन्स विल्यम आणि प्रिन्सेस कॅथरीन यांना क्रिकेटच्या काही महत्त्वाच्या आणि मजेशीर गोष्टी समजावून सांगत होते. प्रिन्स विल्यम आणि प्रिन्सेस कॅथरीन यांनीही त्यांचे म्हणणे खूप लक्ष देऊन ऐकले आणि चेहऱ्यावर गोड हास्य ठेवून या गप्पांचा आनंद घेतला. सचिनजी जेव्हा प्रिन्स विल्यम यांना क्रिकेटचे धडे देत होते, तेव्हा कॅथरीन मिडलटन बाजूला उभ्या राहून अत्यंत आनंदाने हा सगळा खेळ पाहत होत्या.

नवी मुंबई-सिंधुदुर्ग विमानसेवेचा शुभारंभ

मंत्री नितेश राणे यांनी स्वतः विमानाने प्रवास करत लुटला आनंद

(प्रतिनिधी वरुड दर्पण)




सिंधुदुर्ग – दोन वर्षांच्या खंडानंतर चिपी विमानतळावरून नवी मुंबई-सिंधुदुर्ग विमानसेवा सोमवारी पुन्हा सुरू झाली. फ्लाय ९१ या विमान कंपनीच्या सेवेला प्रारंभ झाल्यानिमित्त राज्याचे मत्स्यव्यवसाय आणि बंदरे विकास मंत्री तथा सिंधुदुर्गचे पालकमंत्री नितेश राणे यांनी नवी मुंबई ते चिपी असा विमानप्रवास केला.

सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या पर्यटन विकासासाठी माजी मुख्यमंत्री, माजी केंद्रीय मंत्री आणि खासदार नारायण राणे यांनी पाहिलेले स्वप्न पूर्ण करण्याच्या दिशेने हे महत्त्वाचे पाऊल असल्याचे सांगतानाच, चिपी विमानतळ आता पुन्हा बंद पडणार नाही, अशी ग्वाही नितेश राणे यांनी दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारच्या सहकार्यामुळे विमानसेवा पुन्हा सुरू करणे शक्य झाल्याचेही त्यांनी नमूद केले. विमानसेवेच्या शुभारंभप्रसंगी आयोजित कार्यक्रमात बोलताना मंत्री नितेश राणे म्हणाले, ङ्कआजचा दिवस आपल्या सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी ऐतिहासिक आहे. या विमानतळाचे आणि सिंधुदुर्ग जिल्हा पर्यटनाच्या नकाशावर उज्ज्वल व्हावा, या स्वप्नाचे श्रेय नारायण राणे साहेबांना द्यावे लागेल. हे स्वप्न त्यांनी पाहिले आणि त्या दिशेने काम करण्यासाठी आमच्यासारख्या असंख्य कार्यकर्त्यांना प्रेरित केले. मी जिल्ह्याचा पालकमंत्री झाल्यानंतर असा एकही आठवडा गेला नाही की राणे साहेबांनी मला आपल्या विमानतळाची आठवण करून दिली नाही. 'नितेश, आपला एअरपोर्ट अजून सुरू झालेला नाही,' असे ते सातत्याने सांगत असत.

मालकाने विश्वासाने सोपवलेली २८ लाखांची बॅग घेऊन कुरिअर बॉय पसार, पुणे पोलिसांचा फिल्मी स्टाईल तपास, तब्बल १० हजार किमी पाठलाग करत मुसक्या आवळल्या

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



पुणे – मालकाने मोठ्या विश्वासाने मुंबईत पोहोचवण्यासाठी दिलेली २८ लाख रुपयांची रोकड आणि सोन्या-चांदीच्या दागिन्यांची बॅग घेऊन पळालेल्या कुरिअर बॉयचा पुणे पोलिसांनी फिल्मी स्टाईल पर्दाफाश केला आहे.

पुण्यातील खडक पोलिसांनी तब्बल २५ दिवस आणि १०,००० किलोमीटरचा थरारक प्रवास करत उत्तर प्रदेश आणि उत्तराखंडमधून मुख्य आरोपीसह चार जणांना बेड्या ठोकल्या आहेत. भावाच्या डोक्यावरील १५ लाख रुपयांचे कर्ज फेडण्यासाठी या तरुणाने आपल्या साथीदारांच्या मदतीने हा चोरीचा कट रचल्याचे पोलीस तपासात उघड झाले आहे. पोलिसांनी आरोपींकडून आतापर्यंत २६ लाख ३३ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. मुंबईला जाण्याऐवजी वाटेतूनच पसार तक्रारदार जितेन्द्र ऋषिकेश सिंह यांच्याकडे विशाल सत्यपाल चौहान (वय २०, रा.मिसा कलान, जि.एटा, उत्तर प्रदेश) हा तरुण कुरिअर बॉय म्हणून कामाला होता. सोन्याचे दागिने तयार करण्यासाठी लागणारे सोने, सोन्याची बिस्किटे आणि मजुरीची रोकड मुंबईतील कार्यालयात सुरक्षित पोहोचवण्याची जबाबदारी त्याच्यावर होती. नियमितप्रमाणे विशाल २८ लाख रुपयांची रोकड आणि दागिने असलेली बॅग घेऊन निघाला. मालकाच्या विश्वासाला तडा देऊन कामगारच लाखोंचा ऐवज घेऊन पसार झाल्याने खळबळ उडाली होती. याप्रकरणी खडक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

शेतकऱ्यांना मोठा दिलासा : बोअरवेल आणि विहीर खोदकामावरील निर्बंध १५ डिसेंबरपर्यंत शिथिल

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

अमरावती – शेतीविषयक कामे, पिकांचे संवर्धन आणि सिंचनाची निकड लक्षात घेता जिल्ह्यात शेतीविषयक कामांसाठी नवीन बोअरवेल (विंधन विहीर) आणि विहीर खोदकाम, विहीर बळकटीकरणावरील निर्बंध १५ डिसेंबर २०२६ पर्यंत तात्पुरत्या स्वरूपात शिथिल करण्यात आले आहेत. जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष आशिष येरेकर यांनी यासंदर्भातील आदेश जारी केले आहेत.

दुष्काळ सदृश्य स्थिती पाहता संभाव्य पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर भूजल स्रोतांचे संरक्षण आणि पिण्याच्या पाण्याची उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी यापूर्वी जिल्ह्यात बोअरवेल आणि विहीर खोदकामावर निर्बंध घालण्यात आले होते. मात्र, सध्याची कृषीविषयक कामांची तातडी लक्षात घेता या निर्णयात तात्पुरती सूट देण्यात आली आहे. या आदेशानुसार, १५ डिसेंबर २०२६ पर्यंत शेतकऱ्यांना शेतीच्या कामांसाठी नवीन बोअरवेल किंवा विहीर खोदण्यासाठी प्रशासनाची विशेष परवानगी घेण्याची अट लागू राहणार नाही.

ही सवलत केवळ शेतीविषयक कामांसाठीच लागू राहणारबाहे. या कामासोबतच शेतपरिसरात विहीर पुनर्भरण, विंधन विहीर पुनर्भरण, जलतारा आणि इतर जलसंधारणविषयक उपाययोजना करणे बंधनकारण करण्यात आले आहे. हा आदेश तत्काळ प्रभावाने लागू करण्यात आला असून १५ डिसेंबर २०२६ नंतर बोअरवेल आणि विहीर खोदकामाबाबतचे पूर्वीचे निर्बंध पुन्हा पूर्ववत लागू होतील, असेही या आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

आरबीआयच्या कडक नियमामुळे आता डिजिटल फसवणूकीला आळा : सर्वसमावेशक नियमावली अखेर जाहीर

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



नवी दिल्ली – डिजिटल व्यवहारांमधील वाढत्या सायबर धोक्यांना आळा घालण्यासाठी आणि सुरक्षेत वाढ करण्यासाठी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने अलीकडेच एक सर्वसमावेशक नियमावली जाहीर केली आहे. नव्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, नॉन-बँक पेमेंट सिस्टम ऑपरेटरना सायबर हल्ले, सिस्टीम बिघाड आणि व्यवहारांमधील विलंब यांसारख्या असामान्य घटना घडल्यास त्या शोध लागल्यापासून सहा तासांच्या आत मध्यवर्ती बँकेला कळवणे बंधनकारक करण्यात आले आहे. सर्व नॉन-बँक पेमेंट सिस्टम ऑपरेटरना कोणत्याही सायबर घटनेची माहिती निश्चित नमुन्यात सहा तासांच्या आत आरबीआय आणि 'सर्ट-इन'कडे द्यावी लागेल. नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया , कार्ड नेटवर्क्स, पेमेंट ॲग्रिगेटर्स, प्रीपेड पेमेंट इन्स्ट्रुमेंट जारी करणाऱ्या संस्था आणि व्हाईट-लेबल एटीएम ऑपरेटर यांना ही मार्गदर्शक तत्त्वे लागू होतात. महत्त्वाच्या थर्ड-पार्टी ॲप्लिकेशनचे स्त्रोत कोड सुरक्षित ठेवणे किंवा एस्क्रोमध्ये ठेवणे बंधनकारक करण्यात आले आहे.

क्रांतिसूर्य भगवान बिरसा मुंडा जयंती व जनजातीय गौरव दिन उत्साहात

नारवाटी येथील एकलव्य मॉडेल निवासी शाळेचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आभासी पद्धतीने उदघाटन

धारणी येथे आदिवासी विकास विभागाचा भव्य सोहळा : आ.केवलराम काळे यांची प्रमुख उपस्थिती

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



अमरावती – आदिवासी समाजाचे महानायक, थोर स्वातंत्र्यसेनानी तथा क्रांतिसूर्य भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त आणि जनजातीय गौरव दिनानिमित्त रविवार, १५ नोव्हेंबर रोजी धारणी येथे उत्साहपूर्ण वातावरणात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. धारणी तालुक्यातील नारवाटी गावात उभारण्यात आलेल्या एकलव्य मॉडेल निवासी शाळेचे आभासी पद्धतीने प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

जनजातीय गौरव दिवसानिमित्ताने राज्य शासनाच्या आदिवासी विकास विभागांतर्गत एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, धारणी यांच्या वतीने नवीन प्रशासकीय इमारतीतील सभागृहात हा विशेष सोहळा आयोजित करण्यात आला. यावेळी मेळघाटचे आमदार केवलराम काळे, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे सहाय्यक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी सिद्धार्थ, माजी आमदार प्रभुदास भिलावेकर सह आदिवासी विकास विभागाचे अधिकारी, कर्मचारी, लोकप्रतिनिधी आणि नागरिकांची उपस्थित होते.

आदिवासी समाजाच्या विकासासाठी शासनाच्या विविध योजना, शैक्षणिक प्रगती, सामाजिक सक्षमीकरण आणि सांस्कृतिक वारशाच्या जतनाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. भगवान बिरसा मुंडा यांनी ब्रिटिशांच्या अन्यायकारक राजवटीविरुद्ध संघर्ष करून आदिवासी समाजात स्वाभिमान, एकता आणि अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा निर्माण केली. त्यांच्या क्रांतिकारी विचारांमुळे आदिवासी समाजाच्या इतिहासात त्यांचे स्थान अढळ आहे. त्यांच्या जयंतीनिमित्त साजरा होणारा जनजातीय गौरव दिन हा केवळ उत्सव नसून आदिवासी समाजाचा गौरवशाली इतिहास, संस्कृती, परंपरा आणि अस्मिता जपण्याचा संकल्प असल्याचे या आयोजनातून अधोरेखित करण्यात आले.

यानंतर धारणी येथील जयस्तंभ चौक येथे क्रांतीसुर्य भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेला पुष्पहार करून पूजन करण्यात आले. दुपारी प्रशासकीय इमारत येथील सभागृहामध्ये भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंती निमित्त विविध कार्यक्रम घेण्यात आले. भगवान बिरसा मुंडा यांच्या विचारांचा आदर्श समोर ठेवून आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी एकजुटीने प्रयत्न करण्याचा संदेश या गौरव दिनाच्या निमित्ताने देण्यात आला.

राज्यभरात 'गुलाबी थंडी'ची सुखद चाहूल : पुण्यात राज्यातील सर्वात कमी तापमानाची नोंद, तर विदर्भात पावसाची शक्यता

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



मुंबई – संपूर्ण राज्यात सध्या हवामानाचा लपंडाव सुरू आहे. एकीकडे 'गोड गुलाबी थंडी'ची सुखद चाहूल लागली असताना उत्तरेकडून थंड वारे खाली महाराष्ट्राच्या दिशेनं सरकत आहेत. तर दुसरीकडे पश्चिम बंगालच्या खाडीत कमी दाबाचा पट्टा तयार झाला आहे. सोबतच बंगालच्या उपसागरात तयार होत असलेल्या 'अकबन' चक्रीवादळाचा परिणाम आता राज्यातील हवामानातही जाणवतो आहे. एकीकडे महाराष्ट्रतील बहुतांश जिल्ह्याच्या किमान तापमानात घट होत असतानाचे चित्र असताना, हवामान विभागाने १९ नोव्हेंबरच्या आसपास विदर्भात पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. तर राज्यात पुढील ५ दिवस पावसाचा अंदाज नसला, तरी चक्रीवादळाच्या दिशेनुसार हवामानात बदल होऊ शकतो, असा अंदाज आहे. दरम्यान राज्यात कोणत्या जिल्ह्यात हवामानाची एकंदरीत परिस्थिती काय, हे जाणून घेऊ. राज्यात पुणे येथे राज्यातील सर्वात कमी १२.१ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे.

'मी पुन्हा एकदा निवडणूकीत उभा राहणार आणि निवडून येणार, शिव्या देवून का असेना... : खासदार बजरंग सोनवणे यांचं मिश्किल वक्तव्य

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



मुंबई – एकीकडे राज्याच्या राजकारणात दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलिनीकरणाची चर्चा रंगू लागली आहे. तर दुसरीकडे माजलगावचे आमदार प्रकाश सोळंके यांनी राजकीय निवृत्तीची घोषणा करत आपला वारसदारही जाहीर केलाय.

अशातच आता बीडच्या राजकारणात खासदार बजरंग सोनवणे यांनी आगामी लोकसभा निवडणुकीसाठी आतापासूनच रणशिंग फुंकलंय. मी पुन्हा एकदा लोकसभा निवडणुकीत उभा राहणार आणि निवडूनही येणार, असा ठाम विश्वास खासदार बजरंग सोनवणे यांनी व्यक्त केलाय. एवढंच नाही, तर शिव्या देऊन का असेना, लोक मला मतदान करतीलच, असं मोठं विधान त्यांनी केलंय. गेवराई तालुक्यातील श्रृंगऋषी गडावर आयोजित लोकलढा आंदोलनाच्या बैठकीत ते बोलत होते. दरम्यान, मागच्या वेळीही लोकांनी मला मतदान केलं, यावेळीही करतील, असा विश्वास त्यांनी बोलून दाखवलाय. लोकांचे प्रश्न सोडवण्यासाठीच मी खासदार झालोय, मग यापूर्वीचा खासदार कुठे होता, त्याने कुठे रस्ता केला, कुठे नाली बांधली, हे विचारू का, असा थेट सवालही सोनवणे यांनी उपस्थित केलाय. गेवराई तालुक्यातील श्रृंगऋषी गडावर आयोजित लोकलढा आंदोलनाच्या बैठकीत बोलताना त्यांनी आगामी निवडणुकीचा निर्धारच जाहीर केलाय.

दिवाळीला माहेरी गेली, पण वैनगंगा नदीच्या जंगलात तिचा मृतदेह सापडला

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

पुणे – पुणे विमानतळावर खासगी विमान कंपनीच्या तिकीट काउंटरवर काम करणाऱ्या ३५ वर्षीय वर्षा तुरकर हिचा मध्य प्रदेशातील गोंदिया जिल्ह्यात संशयास्पद मृत्यू झाला आहे. शनिवारी संध्याकाळी ती एका निर्जन जंगल परिसरात गंभीर जखमी अवस्थेत आढळली.

तिच्या शरीरावर धारदार शस्त्राने वार केल्याच्या खुणा होत्या. उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. या घटनेमागे घातपात असल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. तिचा मृतदेह सापडला लुटमारीचा दावा, मित्राची चौकशी सुरु वर्षासोबत असलेल्या नेश अग्रवाल याने पोलिसांना दिलेल्या जबाबात, मुखवटे घातलेल्या तीन अज्ञात व्यक्तींनी त्यांच्यावर हल्ला करून ४० हजार रुपये रोख आणि सोन्याचे दागिने लुटल्याचा दावा केला आहे. नरेशच्या म्हणण्यानुसार, ते दोघे घटनास्थळाजवळ गाडीतून उतरून बोलत असताना तीन अज्ञात व्यक्ती तिथे आले. त्यांनी लुटमारीचा प्रयत्न केला आणि त्यापैकी एकाने वर्षावर चाकूने हल्ला केला. मात्र, त्याच्या जबाबाबाबत पोलिसांना संशय असल्याने त्याला चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले आहे.

कृषी व अन्य शासकीय योजनांचा लाभ मिळण्यासाठी शेतकऱ्यांनी ई-केवायसी व फार्मर आयडी तातडीने तयार करावा

मदत व पुनर्वसन विभागाचे शेतकऱ्यांना आवाहन

अडचणी सोडविण्यास राज्य शासन तत्पर

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



मुंबई – राज्यातील शेतकऱ्यांना केंद्र व राज्य शासनाच्या विविध कृषीविषयक तसेच अन्य विभागांच्या योजनांचा लाभ थेट मिळावा, यासाठी ॲग्रीस्टॅक प्रणालीतील माहिती अद्ययावत असणे आवश्यक आहे. या प्रणालीच्या माध्यमातून कृषी व अन्य विभागांच्या विविध योजनांची मदत शेतकऱ्यांपर्यंत सातत्याने पोहोचविण्यात येत आहे. त्यामुळे दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांनी आपली ई-केवायसी प्रक्रिया तातडीने पूर्ण करून फार्मर आयडी प्राप्त करून घ्यावा, असे आवाहन मदत व पुनर्वसन विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

शासनाच्या विविध योजनांमधून शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य, अनुदान व अन्य लाभ देण्यात येतात. यापूर्वीही शासनाने विविध संकटांच्या काळात शेतकऱ्यांना आर्थिक मदत उपलब्ध करून दिली आहे. सध्या राज्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी अग्रीम मदत देण्याच्या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर ई-केवायसी व फार्मर आयडीचे महत्त्व अधिक वाढले आहे. पात्र शेतकऱ्यांना मदतीची रक्कम थेट त्यांच्या बँक खात्यात जमा होण्यासाठी आवश्यक नोंदणी व पडताळणी प्रक्रिया पूर्ण असणे गरजेचे आहे.

ॲग्रीस्टॅक प्रणालीच्या माध्यमातून शेतकऱ्यांची माहिती एकत्रित व अद्ययावत करण्यात येत असून, विविध शासकीय योजनांचा लाभ देण्यासाठी ही माहिती उपयुक्त ठरत आहे. शेतकऱ्यांनी ई-केवायसी तसेच फार्मर आयडीची प्रक्रिया पूर्ण केल्यास योजनांचा लाभ मिळण्यातील अडचणी कमी होण्यास मदत होणार आहे. ई-केवायसी किंवा फार्मर आयडी तयार करताना शेतकऱ्यांना काही तांत्रिक अथवा अन्य अडचणी येत असल्यास राज्य शासनामार्फत त्या सोडविण्यासाठी आवश्यक सहकार्य करण्यात येईल. शेतकऱ्यांनी कोणत्याही अडचणीमुळे प्रक्रिया अपूर्ण ठेवू नये. संबंधित यंत्रणांशी संपर्क साधून आपली माहिती अद्ययावत करावी व आवश्यक पडताळणी पूर्ण करावी.

शासनाच्या विविध योजनांचा लाभ पात्र शेतकऱ्यांपर्यंत वेळेत आणि पारदर्शक पद्धतीने पोहोचावा, यासाठी ई-केवायसी व फार्मर आयडी पूर्ण करणे महत्त्वाचे आहे. शेतकऱ्यांनी फार्मर आयडी तयार करण्यासाठी जवळच्या सीएससी (नागरी सुविधा केंद्र) येथे आधार कार्ड व आधारशी संलग्न मोबाईल क्रमांकासह जाऊन फार्मर आयडी तयार करून घ्यावा. राज्यातील शेतकऱ्यांनी या प्रक्रियेला प्राधान्य देऊन तातडीने पूर्ण करून घ्यावे, असे आवाहन मदत व पुनर्वसन विभागाने केले आहे.

सोने-चांदीचे दर

शुध्द सोने -९६१०८१० रु.(१०ग्रॅम)

२२.कॅ सोने - ९४,७०० रु.(१०ग्रॅम)

चांदी - १,३०,००० रु. (प्र.किलो)

कृषी उत्पन्न बाजार समिती अमरावती

बाजारभाव (क्विंटलमध्ये)

ज्वारी -	१६५० -	२०००
गहू -	२५०० -	३०००
तूर -	६१०० -	६३९०
मूग -	६५०० -	७०००
उडीद -	६००० -	७०००
हरभरा -	५६०० -	५९००
सोयाबिन -	४१०० -	४३५०
बाजरा -	२००० -	२३००
तिळ -	८२०० -	९३००
भुईमूग -	५१५० -	५३५०
मका -	२२०० -	२३००

छठपूजेचा प्रसाद खाल्ल्याने आईचा संताप अनावर

चार वर्षांच्या चिमुरडीला बेदम मारहाण, उपचारादरम्यान मृत्यू

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



समस्तीपूर – छठपूजेसाठी बनवलेला प्रसाद खाल्ल्याच्या रागातून आईनेच आपल्या चार वर्षांच्या मुलीला बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना बिहारमधील समस्तीपूर जिल्ह्यात घडली आहे. या मारहाणीनंतर मुलीची प्रकृती बिघडली. तिला उपचारासाठी खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी आईला अटक केली असून पुढील तपास सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मृत मुलीचे नाव सुहानी कुमारी (वय ४) असे असून ती राजू पासवान आणि रीना कुमारी यांची मुलगी होती. छठपूजेनिमित्त पासवान कुटुंबीय सणाच्या तयारीत व्यस्त होते. कुटुंबातील इतर सदस्य पूजेच्या तयारीसाठी जवळच्या घाटावर गेले होते. त्यावेळी रीना घरी पूजेसाठी प्रसाद तयार करत होती. याचदरम्यान, सुहानीने प्रसादासाठी तयार केलेल्या पदार्थांपैकी एक पदार्थ खाल्ल्याचे सांगितले जाते. यामुळे संतापलेल्या रीनाने मुलीला मारहाण केल्याचा आरोप आहे. या घटनेनंतर सुहानीची प्रकृती बिघडली. त्यानंतर रीनाने तिला उपचारासाठी खासगी नर्सिंग होममध्ये दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी तपासणीनंतर तिला मृत घोषित केले.



महाराष्ट्र कायम अव्वल राहणार

एमआयडीसीचे सीईओ दीपेंद्र कुशवाह यांचे प्रतिपादन

*** एआय, डेटा सेंटर आणि उत्पादनांच्या क्षेत्रात प्रचंड संधी**

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



मुंबई – देशाची पहिली एक ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था बनवण्याच्या महाराष्ट्राच्या लक्ष्यात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावणार आहे, असे प्रतिपादन मुख्य कार्यकारी अधिकारी दीपेंद्र कुशवाह यांनी केले आहे. 'द फ्री प्रेस जर्नल' दिलेल्या विशेष मुलाखतीत त्यांनी आगामी दशकासाठी राज्याच्या औद्योगिक विकासाचा एक विस्तृत आराखडा मांडला आहे.

एमआयडीसीची धुरा कठीण काळात हाती घेतल्याचे विचारले असता, त्यांनी हा काळ कठीण नसून महाराष्ट्र आणि माझ्यासाठी महामंडळाला पुढे नेण्याची एक मोठी संधी असल्याचे स्पष्ट केले. मजबूत धोरणे आणि रेल्वे, रस्ते, आंतरराष्ट्रीय उड्डाणे, माल वाहतूक व बंदरे यांसारख्या पायाभूत सुविधांच्या बळावर महाराष्ट्र अनेक निकषांवर देशात पहिल्या क्रमांकावर आहे. भूमी आणि व्यवसाय सुलभता (ईज ऑफ डुइंग बिजनेस) या दोन मोठ्या आघाड्यांवर सध्या काम सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

डेटा विश्लेषणासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) वापर उद्योगांना परवडणाऱ्या किमतीत जमीन उपलब्ध करून दिली जात असून प्रत्येक शहरात जमिनीचा दर वेगवेगळा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पारदर्शकता आणण्यासाठी २०२३ मध्ये राज्यात सिंगल विंडो (एकल खिडकी) कायदा लागू करण्यात आला आहे. याद्वारे सेवांची यादी, कालमर्यादा आणि जबाबदार अधिकार्यांची नावे निश्चित करण्यात आली आहेत. सध्या एमआयडीसीच्या सुमारे ३६ सेवा ऑनलाइन उपलब्ध असून निर्णय प्रक्रिया आणि डेटा विश्लेषणासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) वापर केला जात असल्याचे कुशवाह यांनी सांगितले.

जन्मदात्या वडिलांचं डोकं आधी भिंतीवर आदळलं नंतर गळा आवळला पुढे... पोटच्या मुलाचं राक्षसी कृत्य

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

छत्रपती संभाजीनगर – छत्रपती संभाजीनगर शहरातून एक काळीज सुन्न करणारी घटना घडली आहे. एका ३३ वर्षीय मुलानेच आपल्या जन्मदात्या पित्याची निर्घृण हत्या केली आहे. रेल्वे स्टेशन परिसरातील हमालवाड्यात शनिवारी रात्री सव्वानऊच्या सुमारास हा प्रकार घडला. याप्रकरणी छत्रपती संभाजीनगरमधील सातारा पोलिसांनी तातडीने कारवाई करत आरोपी मुलाला आपल्या ताब्यात घेतलं आहे. मृतकाचे नाव साहेबराव बाबूराव म्हस्के असून त्यांचे वय ७३ होते. तर याप्रकरणात नराधम मुलगा कैलास साहेबराव म्हस्के (वय ३३) याला अटक करण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, साहेबराव म्हस्के हे छत्रपती संभाजीनगरमधील रेल्वे स्टेशन परिसरातील हमालवाडा येथे आपल्या कुटुंबासह राहत होते. आरोपानुसार हा वाद इतका विकोपाला गेला की, संतापाच्या भरात कैलासने वडिलांचे डोके भिंतीवर आदळले, धक्कादायक म्हणजे एवढ्यावरच न थांबता त्याने थेट आपल्याच पित्याचा गळा आवळला. या भीषण हल्ल्यात साहेबराव गंभीर जखमी होऊन खाली कोसळले.

फक्त २ मिनिटांत करा हे काम, नाहीतर खात्यात जमा होणार नाही शेतकरी योजनेचा पैसा

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

मुंबई – शेतकऱ्यांना सरकारी योजनांचा लाभ मिळवण्यासाठी आता केवळ अर्ज करून चालणार नाही. त्यासाठी ई-केवायसी पूर्ण असणे आणि फार्मर आयडी तयार असणेही आवश्यक आहे. केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध कृषी योजनांसह अन्य योजनांचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी ही प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करावी, असे आवाहन मदत व पुनर्वसन विभागाने केले आहे. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी प्रक्रिया महत्त्वाची राज्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत थेट त्यांच्या बँक खात्यात मिळावी, यासाठी ॲग्रीस्टॅक प्रणालीतील माहिती अद्ययावत असणे आवश्यक आहे. राज्य सरकारने दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी अग्रीम मदत देण्याचा निर्णय घेतला होता.

महाबळेश्वरमधील तीन हॉटेल्सचे परवाने निलंबित

अन्न व औषध प्रशासनाची कारवाई

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



महाबळेश्वर – दिवाळीत अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) महाबळेश्वरमधील तीन प्रसिद्ध हॉटेलांचे अन्न व्यवसाय परवाने निलंबित केले आहेत. अचानक केलेल्या तपासणीत या हॉटेलांमध्ये स्वच्छतेसंदर्भातील गंभीर त्रुटी आढळून आल्या. याशिवाय अन्य पाच हॉटेलांनाही नोटिसा बजावण्यात आल्या असून, त्रुटी दूर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. हॉटेल एव्हरशाइन, क्षेत्र महाबळेश्वर येथील हॉटेल पथकाने यांच्या नेतृत्वाखालील ही अचानक तपासणी मोहीम राबवली. महाबळेश्वरमधील अनेक हॉटेलांच्या स्वयंपाकघरांची तसेच रेस्टॉरंटमधील सुविधांची तपासणी करण्यात आली. यात अन्य पाच आस्थापनांमध्येही अन्नसुरक्षा आणि स्वच्छतेच्या नियमांचे उल्लंघन झाल्याचे आढळले. त्यामुळे त्यांना नोटिसा बजावून संबंधित त्रुटी दूर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. अन्न व औषध प्रशासनाच्या कारवाईचा फटका पर्यटकांना बसला आहे. त्यांना ऐनवेळी दुसऱ्या हॉटेलमध्ये जावे लागत आहे तर काहींना आपले प्रवासाचा बेतच रद्द केल्याचे दिसत आहे.

महाबळेश्वरमधील तीन प्रसिद्ध हॉटेलांचे अन्न व्यवसाय परवाने निलंबित केले आहेत. अचानक केलेल्या तपासणीत या हॉटेलांमध्ये स्वच्छतेसंदर्भातील गंभीर त्रुटी आढळून आल्या. याशिवाय अन्य पाच हॉटेलांनाही नोटिसा बजावण्यात आल्या असून, त्रुटी दूर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. हॉटेल रामसुख आणि नाकिंदा येथील हॉटेल ब्राइटलँडमध्ये स्वच्छतेसंदर्भातील गंभीर त्रुटी आढळून आल्या. त्यामुळे एफडीएने या तिन्ही हॉटेलांचे अन्न व्यवसाय परवाने काही दिवसांसाठी निलंबित केले आहेत. या हॉटेलच्या रेस्टॉरंटमधील खाद्य सेवा तात्पुरती बंद केली आहे.

एफडीएचे सहआयुक्त संजय शिंदे

जीसीसी क्षेत्रात महाराष्ट्राची आगेकूच!

तिसऱ्या क्रमांकावर असलेल्या हैदराबादला मागे टाकण्याची तयारी

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



मुंबई – जागतिक क्षमता केंद्रे उभारण्यासाठी महाराष्ट्र हे देशातील प्रमुख केंद्र म्हणून उदयास येत आहे. मुंबई आणि पुणे ही दोन शहरे महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाची जुळी इंजिने ठरत असून, जीसीसी केंद्रांच्या संख्येत सध्या देशात तिसऱ्या क्रमांकावर असलेल्या हैदराबादला मागे टाकण्याच्या स्पर्धेत महाराष्ट्र उतरला आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने राज्याचे हे स्थान अधिक भक्कम करण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. मुंबई आणि पुणे या दोन प्रमुख व्यावसायिक केंद्रांच्या सामर्थ्याचा उपयोग करून अधिकाधिक बहुराष्ट्रीय कंपन्यांना राज्यात जागतिक स्तरावरील कामकाज केंद्रे सुरू करण्यासाठी आकर्षित करण्यावर महामंडळाचा भर आहे.

'फ्री प्रेस जर्नल'ला दिलेल्या विशेष मुलाखतीत एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी दीपेंद्र कुशवाह यांनी महाराष्ट्र जीसीसी केंद्रांच्या संख्येत हैदराबादला मागे टाकू शकतो, असा विश्वास व्यक्त केला. जागतिक कंपन्यांसाठी देशातील आघाडीचे केंद्र बनण्याची महाराष्ट्राची महत्त्वाकांक्षा यातून स्पष्ट होत असल्याचे त्यांनी सांगितले.

मुंबईत सध्या २०० हून अधिक जीसीसी केंद्रे आहेत. दुसरीकडे, पुण्यात या क्षेत्राचा विस्तार वेगाने होत आहे. २०१९ मध्ये पुण्यात २१० असलेली जीसीसी केंद्रांची संख्या २०२६ मध्ये ५०० हून अधिक झाली आहे. म्हणजेच या कालावधीत जवळपास १३८ टक्क्यांची वाढ नोंदविण्यात आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या महाराष्ट्राला देशातील आघाडीचे जीसीसी केंद्र बनविण्याच्या संकल्पनेचा हा महत्त्वाचा भाग आहे. सुरुवातीला मुंबई आणि पुण्यातील जीसीसी परिसंस्था अधिक सक्षम करण्यावर भर दिला जाणार असून, त्यानंतर नागपूर, नाशिक आणि छत्रपती संभाजीनगरसारख्या शहरांमध्येही या उपक्रमाचा विस्तार करण्याची योजना आहे. या माध्यमातून प्रस्थापित औद्योगिक आणि व्यावसायिक केंद्रांपलीकडे गुंतवणूक आकर्षित करणे, विविध भागांमध्ये रोजगाराच्या संधी निर्माण करणे आणि राज्याचा औद्योगिक व आर्थिक विकास अधिक संतुलित करणे, हे व्यापक उद्दिष्ट असल्याचे कुशवाह यांनी स्पष्ट केले.



